# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. ११७ -१२५

( विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीतील बैठका )

## दिनांक : ६ मार्च ते ७ एप्रिल २०१७

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| ११७ | ०५ मार्च | सह्याद्री |
| ११८ | ०९ मार्च | विधानभवन |
| ११९ | १६ मार्च | विधानभवन |
| १२० | १७ मार्च | वर्षा |
| १२१ | १८ मार्च | विधानभवन |
| १२२ | २३ मार्च | विधानभवन |
| १२३ | ३० मार्च | विधानभवन |
| १२४ | ६ एप्रिल | विधानभवन |
| १२५ | ७ एप्रिल<br>( मंत्रिपरिषद ) | विधानभवन |

५ मार्च २०१७
वन विभाग

## राज्यात विद्यार्थी हरित सेना निर्माण करण्याचा निर्णय

राष्ट्रीय हरित सेना कार्यक्रमांतर्गत अस्तित्वातील ८ हजार ८०७ शाळांमधील इको-क्लबचे बळकटीकरण करण्यासाठी राज्यात विद्यार्थी हरित सेना निर्माण करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

विद्यार्थ्यांना पर्यावरणाच्या सद्यस्थितीबाबत विविध उपक्रमांद्वारे अद्ययावत माहिती देण्यासह त्यांना पर्यावरण संवर्धनाच्या प्रत्यक्ष कामामध्ये सहभागी करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी या शाळांना विद्यार्थी हरित सेना या योजनेंतर्गत प्रति वर्षी प्रति शाळा २५०० रुपये इतके अनुदान मंजूर करण्यात येणार आहे. ही योजना प्रायोगिक तत्त्वावर तीन वर्षांसाठी सुरू राहणार असून त्यानंतर योजनेच्या फलनिष्पत्तीबाबत आढावा घेऊन योजना पुढे चालू ठेवण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

-----०-----

५ मार्च २०१७
विधि व न्याय विभाग

## भारतीय भागीदारी अधिनियमांतर्गत दंडाच्या रकमेत सुधारणा

भारतीय भागीदारी अधिनियम १९३२ मधील कलम ५९अ (१) व कलम ६९ अ मध्ये असलेल्या दंडाच्या रकमेत अनुक्रमे १०० रुपयांऐवजी १००० रुपये आणि प्रतिदिन १० रुपयांऐवजी प्रति वर्ष (अथवा त्याच्या काही भागासाठी) २००० रुपये शुल्क अशी सुधारणा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

भारतीय भागीदारी अधिनियम १९३२ मधील कलम ५९अ (१) मध्ये सद्यस्थितीत १०० रुपये इतक्या दंडाची तरतूद आहे. तसेच कलम ६९ (अ) मध्ये १० रुपये प्रतिदिन इतक्या दंडाची तरतूद आहे. या दंड व शुल्काच्या रक्कमा १९८५ मध्ये निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यावेळेस नोंदणी शुल्क ५० रुपये होते, ते आता १५०० रुपये झाले आहे. या दंड व शुल्काच्या रक्कमा निश्चित केल्यानंतर आता तीस वर्षांहून अधिक काळ उलटून गेला आहे. या काळात रुपयाच्या झालेल्या अवमूल्यनाचा विचार करता, या रकमांमध्ये सुधारणा होणे आवश्यक होते.

या अधिनियमातील संबंधित कलमांमध्ये सुधारणा झाल्यामुळे राज्याच्या उत्पन्नात काही अंशी वाढ होणार आहे. त्याचप्रमाणे भागीदारी संस्थांना नियमांचे पालन करण्यास चालना मिळून प्रलंबित प्रकरणे त्वरेने निकाली निघण्यास मदत होणार आहे. यासंदर्भातील विधेयक विधानमंडळास सादर करण्यासही आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

५ मार्च २०१७
सहकार विभाग

अधिनियमात नवीन परंतुकांचा समावेश

**सहकारी संस्थेत अनियमितता करणाऱ्यांविरुद्ध चौकशीचा कालावधी वाढविण्याचा निर्णय**

सहकारी संस्थांमध्ये अनियमितता-गैरव्यवहार इत्यादी बाबींमुळे झालेल्या संस्थेच्या नुकसानीबाबत गैरकृत्य करणाऱ्या अपचाऱ्यांवर चौकशीअंती जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ चे पोटकलम (१) मध्ये नव्याने परंतुके समाविष्ट करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यात सध्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशीची एकूण ४४ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी पाच ते दहा वर्षातील १९ प्रकरणे असून दहा वर्षावरील २ प्रकरणे प्रलंबित आहेत. या कायद्यातील तरतुदीमुळे अडीच वर्षात चौकशी पूर्ण करणे आवश्यक आहे. मात्र, बऱ्याच प्रकरणांमध्ये विविध कारणांमुळे ती वेळेत पूर्ण करणे शक्य होत नाही. या कालावधीत चौकशी पूर्ण न झाल्यास निबंधकास संस्थेच्या नुकसान भरपाईचे आदेश देता येत नाहीत. त्यामुळे संस्था आर्थिक अडचणीत येतात. त्याचप्रमाणे, अशा परिस्थितीत अपचाऱ्यावर जबाबदारी निश्चितीअंती दंडात्मक कार्यवाही न झाल्याने अशा अपप्रवृत्तींना जरब बसत नाही. त्यामुळे असे अपचारी अशी कृत्ये करण्यापासून परावृत्त न होता, वारंवार अनियमितता करण्यास धजावतात. या कारणास्तव कलम ८८ मधील चौकशीचा कालावधी वाढविण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम-१९६० चे कलम ८८ मधील पोटकलम (१) च्या परंतुक एक नंतर नव्याने परंतुके समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या परंतुकानुसार अडीच वर्षाच्या कालावधीनंतर शासनास स्वेच्छाधिकारात किंवा निबंधकांच्या अहवालानुसार या पोटकलमाखालील कार्यवाही पूर्ण होईपर्यंत आश्यकतेनुसार वेळोवेळी कालावधी वाढविता येणार आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश २०१७ च्या प्रारंभापर्यंत या पोटकलमाखालील कार्यवाहीसाठी मुदतवाढ देऊन त्या अपूर्ण असलेल्या कार्यवाहीसाठीचा कालावधी शासनास स्वेच्छाधिकारात किंवा निबंधकांच्या अहवालानुसार वाढविता येणार आहे.

-----०-----

५ मार्च २०१७
नगर विकास विभाग

**अचलपूर नगरपरिषद संचालित तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे शासनास हस्तांतरण**

आदिवासीबहुल क्षेत्रातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाची सुविधा मिळण्यासाठी अचलपूर नगरपरिषदेकडून सुरू करण्यात आलेले अचलपूर तंत्रनिकेतन महाविद्यालय राज्य शासनास हस्तांतरित करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

तंत्रनिकेतन महाविद्यालयाची १.१ हेक्टर जागा आणि त्या जागेवरील इमारत बांधकाम तसेच त्या इमारतीतील साहित्य यांचे विना मोबदला उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे कायमस्वरुपी हस्तांतरण करण्यात येणार आहे. या हस्तांतरणात महाविद्यालयाच्या सर्व चल व अचल मालमत्तेचा समावेश आहे. या महाविद्यालयातील विहित कार्यपद्धतीने नियुक्त व कार्यरत

२५ शिक्षक तसेच २५ शिक्षकेतर कर्मचारी मिळून एकूण ५० कर्मचाऱ्यांचे समावेशन देखील उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

हस्तांतरणाच्या प्रक्रियेबरोबरच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समावेशनाची कार्यवाही सहा महिन्यांत पूर्ण करण्यात येईल. यापूर्वीचे थकित वेतन व दायित्वे तसेच हस्तांतरणाचा निर्णय झाल्यापासून सहा महिन्यापर्यंतचे वेतन नगरपरिषदेकडून देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सहा महिन्यानंतरचा वेतन व अन्य सर्व बाबींवरील संपूर्ण खर्च उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत करण्यात येईल. त्यासाठी आवश्यक असणारी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासही मान्यता देण्यात आली. हस्तांतरणाची कार्यवाही वेळेत पूर्ण करण्यासाठी अमरावतीचे जिल्हा प्रशासन अधिकारी आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग निर्देशित करेल असा सहसंचालक दर्जापेक्षा कमी नसेल अशा अधिकाऱ्यांची द्विसदस्यीय समिती स्थापन करण्यात येणार आहे.

-----o-----

५ मार्च २०१७

गृह विभाग

ॲसिड हल्ला, बलात्कार प्रकरणांमध्ये पाच लाख नुकसान भरपाई

## महाराष्ट्रात एखाद्या गुन्ह्यात बळी पडलेल्या पात्र व्यक्तींना २००९ पासून नुकसान भरपाई मिळणार

महाराष्ट्रात एखाद्या गुन्ह्यात बळी पडलेल्या व्यक्तींसाठी नुकसानभरपाई योजना-२०१४ मधील हानी अथवा इजा या संज्ञेच्या व्याख्येची व्याप्ती वाढवून त्यात आणखी ११ बाबींचा समावेश करण्याचा तसेच ही योजना फक्त पात्र प्रकरणांच्या बाबतीत ३१ डिसेंबर २००९ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

फौजदारी प्रक्रिया संहिता (सुधारणा) अधिनियम, २००८ (२००९ चा ५) या सुधारणा अधिनियमाद्वारे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये कलम ३५७ क चा समावेश करण्यात आला आहे. यानुसार एखाद्या गुन्ह्यात ज्यांना हानी अथवा इजा पोहोचली आहे अशा बळी पडलेल्या व्यक्तींना किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना राज्य शासनाने केंद्र शासनाशी समन्वय साधून नुकसानभरपाई देण्यासाठी राज्याने ११ एप्रिल २०१४ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे नुकसानभरपाई योजना २०१४ लागू केली आहे. या योजनेंतर्गत बळी पडलेल्या व्यक्तींकरिता नुकसान भरपाई निधी स्थापन करण्यात आला आहे. हानी अथवा इजा या प्रकारात प्रामुख्याने जीवित हानी, कायमस्वरूपी विकलांगता, ॲसिड हल्ला, बलात्कार यांचा समावेश करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे ॲसिड हल्ला किंवा बलात्कार या प्रकरणांमध्ये हानी अथवा इजा झालेल्यांच्या बाबतीत नुकसान भरपाईची रक्कम पाच लाख इतकी निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही सुधारित योजना अधिसूचना काढल्याच्या दिनांकापासून अंमलात येणार आहे.

-----o-----

५ मार्च २०१७
नगर विकास विभाग

**अमरावती शहराच्या सुधारित विकास योजनेतील**
**क्रीडांगण आणि शाळेच्या आरक्षणाची पुनर्रचना**

अमरावती शहराची सुधारित विकास योजना १९९२ मध्ये मंजूर झाली असून त्यामध्ये मौजा-निंभोरा सर्व्हे क्रमांक ५ (भाग) व सर्व्हे क्रमांक ६१ (भाग) या जागेवर आरक्षण क्रमांक २९१ नुसार ०.३६ हेक्टर क्षेत्रावर प्राथमिक शाळा व आरक्षण क्रमांक २९२ नुसार १.८५ हेक्टर क्षेत्रावर खेळाचे मैदान आरक्षित करण्यात आले आहे. ही आरक्षणे पुनर्रचित करून त्या ठिकाणी आरक्षण क्रमांक २९१ मध्ये ०.७८ हेक्टर क्षेत्रावर प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा आणि आरक्षण क्रमांक २९२ मध्ये १.४३ हेक्टर क्षेत्रावर क्रीडांगणाचे आरक्षण दर्शविण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयानुसार पुनर्रचित आरक्षण क्रमांक २९१ मध्ये ४० टक्के जागा खुली ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच क्रीडांगणाचे आरक्षण कमी झाल्याने जनतेच्या सुविधेसाठी त्या प्रभागातील खेळाच्या मैदानासाठी भविष्यात एकूण आरक्षित क्षेत्राचे प्रमाण पुरेसे राखले जाईल याची काळजी अमरावती महानगरपालिकेने घेणे आवश्यक करण्यात आले आहे.

-----०-----

५ मार्च २०१७
गृह विभाग

<u>अपराधांची चौकशी सहा महिन्यात पूर्ण करणे बंधनकारक</u>

**लोकसेवकांना निर्भीडपणे कर्तव्ये**
**पार पाडता येण्यासाठी भारतीय दंड संहितेमध्ये सुधारणा**

लोकसेवकांना त्यांची कर्तव्ये पार पाडताना धाक दाखवून, हल्ला करुन अथवा दुखापत पोहोचवून अडथळा निर्माण करणाऱ्यास आता कठोर शिक्षेला सामोरे जावे लागणार आहे. लोकसेवकांना त्यांची कर्तव्ये निर्भीडपणे पार पाडता यावीत यासाठी भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ३३२ आणि ३५३ मध्ये सुधारणा करण्यास आणि सहा महिन्यात अपराधांची चौकशी पूर्ण होण्यासाठी कलमांमध्ये तरतूद करण्यास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

लोकसेवकांना कर्तव्ये पार पाडताना अडथळा होणे, धाक दाखविला जाणे, हल्ला होणे, इजा पोहोचविली जाणे अशा स्वरुपाच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. सन २०११ ते ऑगस्ट २०१६ या कालावधीमध्ये भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३३२, ३३३ आणि ३५३ खाली एकूण १७ हजार ६८२ प्रकरणांची नोंद झाली आहे. लोकसेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोहोचविल्यास भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ३३२ अंतर्गत हा अपराध करणाऱ्यास ३ वर्ष कारावास अथवा दंड किंवा दोन्ही शिक्षा या स्वरुपाची तरतूद होती. यामध्ये सुधारणा करुन आता ५ वर्षापर्यंत कारावास अथवा दंड किंवा दोन्ही शिक्षा अशी तरतूद करण्यात आली आहे.

लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारी पात्र बलप्रयोग केल्यास भारतीय दंड संहिता १८६० मधील कलम ३५३ अंतर्गत हा अपराध करणाऱ्यास २ वर्ष कारावास अथवा दंड किंवा दोन्ही शिक्षा या स्वरुपाची तरतूद होती.

यामध्ये सुधारणा करुन आता ५ वर्षापर्यंत कारावास अथवा दंड किंवा दोन्ही शिक्षा अशी तरतूद करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील कलम ३०९ च्या पोटकलम (१) अंतर्गत असलेल्या परंतुका पुढे जादा परंतुक दाखल करण्यात येणार आहे. त्यानुसार भारतीय दंड संहितेच्या कलम ३३२ किंवा कलम ३५३ खालील अपराधांशी संबंधित चौकशी किंवा संपरीक्षा असेल तेव्हा आरोपपत्र दाखल झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत अशा अपराधांची चौकशी किंवा संपरीक्षा पूर्ण करण्याची तरतूद देखील समाविष्ट करण्यात आली आहे.

-----o-----

९ मार्च २०१७

जलसंपदा विभाग

## प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात सुक्ष्म सिंचनासाठी पूरक वितरण व्यवस्था निर्माण करण्याचे धोरण

राज्यात सिंचनासाठी उपलब्ध पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करण्यासाठी सिंचन प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात सुक्ष्म सिंचनास पूरक वितरण व्यवस्था निर्माण करण्याच्या धोरणास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

वितरण व्यवस्थेच्या नवीन धोरणामुळे सुक्ष्म सिंचनास प्रोत्साहन मिळून त्यात वेगाने वाढ होण्यास मदत होणार आहे. तसेच मोठ्या प्रमाणात पाणी बचत होण्यासह राज्याच्या नियोजित सिंचन क्षेत्रात आणि लाभक्षेत्रातील भूजल पातळीत देखील वाढ होणार आहे. त्यामुळे पिण्याचे पाणी व जनावरांना चारा इत्यादी महत्त्वाचे प्रश्न स्थानिक स्तरावर सुटण्यास मदत होईल.

या धोरणानुसार सिंचन प्रकल्पांच्या संपूर्ण लाभक्षेत्रात सुक्ष्म सिंचन पद्धती अनिवार्य करण्यात येऊन त्यानुसार वितरण व्यवस्थेचे नियोजन करण्यात येईल. याअंतर्गत प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील जलसंधारण, स्थानिक स्तर, कृषी इत्यादी विभागांकडून विविध योजनांमधून पूर्ण झालेले व यापुढे पूर्ण होणारे लघु पाटबंधारे तलाव, पाझर तलाव, गाव तलाव, कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे यांचा वापर वितरण व्यवस्थेचा भाग म्हणून करण्यासाठी इतर विभागांकडील जलसाठे (वॉटर बॉडीज) जलसंपदा विभागाकडे सिंचन व्यवस्थापनासाठी हस्तांतरित करण्यात येणार आहेत. तसेच कालव्यातून जलसाठ्यामध्ये पाणी भरून देण्यासाठी नैसर्गिक नाल्यांचा वापर पोहोच कालवे (Feeder Canal) म्हणून केला जाणार आहे.

त्याचप्रमाणे नव्याने जलसाठे निर्माण करण्यात येणार आहेत. त्यासाठी महसूल विभागाकडील उपलब्ध असणारी सुयोग्य शासकीय जमीन या नव्या जलसाठ्यांसाठी जलसंपदा विभागाच्या मागणीनुसार विनामुल्य दिली जाणार आहे. मात्र, शासकीय जमीन उपलब्ध नसल्यास आवश्यक खाजगी जमिनीचे संपादन प्रकल्प खर्चातून केले जाणार आहे. राज्य जलनिती व महाराष्ट्र सिंचन पद्धतींचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम-२००५ मधील तरतुदीनुसार लाभक्षेत्रातील विकेंद्रित जलसाठ्यांच्या लाभक्षेत्रावर पाणी वापर संस्था स्थापन करणे अनिवार्य असणार आहे. सुक्ष्म सिंचन पद्धतीसाठी नियोजित लाभक्षेत्रात जागोजागी सर्वसाधारणपणे १०० हेक्टरचा चक (block) करुन त्या क्षेत्रास किमान १५ दिवस पुरेल इतक्या क्षमतेचे विकेंद्रित साठे निर्माण करण्यात येतील व तांत्रिकदृष्ट्या शक्य असेल तेथे विकेंद्रित जलसाठे भरुन देण्यासाठी पाईपलाईनचा वापर करण्यात येईल. लाभक्षेत्रातील विकेंद्रित

जलसाठ्यांमध्ये पाणी वितरित केल्यानंतर त्यावरील सिंचन क्षमता निर्माण झाल्याचे घोषित केले जाईल.

संपूर्ण सुक्ष्म सिंचनाचे दीर्घकालीन उद्दिष्ट ठेऊन बांधकामाधीन प्रकल्पांच्या बाबतीत वितरण व्यवस्थेची सद्यस्थिती, झालेले भू-संपादन तसेच अस्तित्वात असलेले करार या सर्वांचा परामर्श घेऊन तसेच लाभार्थीशी विचार-विनिमय करुन वितरण व्यवस्थेच्या आराखड्यात आवश्यक बदल करण्यात येतील. पूर्ण व बांधकामाधीन प्रकल्पाच्या निर्माण झालेल्या प्रवाही वितरण व्यवस्थेचे रुपांतरण टप्प्याटप्प्याने सुक्ष्म सिंचनासाठी पूरक व्यवस्थेमध्ये केले जाणार आहे. सुक्ष्म सिंचनास पूरक वितरण व्यवस्थेचे संकल्पन, नियोजन व अंमलबजावणीबाबत जलसंपदा विभागामार्फत मार्गदर्शक सूचना दिल्या जाणार आहेत.

-----०-----

९ मार्च २०१७

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## सिम्बॉयसिस स्कील्स अँड ओपन युनिव्हर्सिटी या स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठाच्या स्थापनेस मंजुरी

पुणे येथील सिम्बॉयसिस ओपन एज्युकेशन सोसायटी या प्रायोजक मंडळास पिंपरी-चिंचवड महानगरपालिका परिसरातील किवळे येथे -सिम्बॉयसिस स्कील्स अँड ओपन युनिव्हर्सिटी॰ हे स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी विधिमंडळासमोर सादर करण्यात येणाऱ्या मसुद्यासही मान्यता देण्यात आली.

राज्यात कुशल मनुष्यबळासोबतच उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्याच्या मार्गदर्शक सूचना यापूर्वीच राज्य शासनाकडून निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार पुणे येथील सिम्बॉयसिस ओपन एज्युकेशन सोसायटीस अशा स्वरूपाचे विद्यापीठ स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली.

-----०-----

१६ मार्च २०१७
नगर विभाग-२

पनवेल महापालिका क्षेत्रासाठी निर्णय

**लोखंड-पोलादाशी संबंधित केवळ व्यापार करणाऱ्यांना**
**एलबीटी करातून वगळण्याचा निर्णय**

स्टील मार्केटमध्ये कोणतीही प्रक्रिया न करणारे आणि केवळ व्यापार करणाऱ्या व्यावसायिकांना लोखंड व पोलाद आणि त्यासंबंधित वस्तूंवरील (नोंद क्रमांक ५५) स्थानिक संस्था कराच्या आकारणीतून वगळण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

पनवेल महानगरपालिका १ ऑक्टोबर २०१६ पासून नव्याने अस्तित्वात आली आहे. या महानगरपालिका क्षेत्रामध्ये १ जानेवारी २०१७ पासून स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला आहे. राज्य शासनाने पनवेल जवळ स्टील उद्योगासाठी सिडको व एमएमआरडीए मार्फत जागा उपलब्ध करून दिली आहे. सद्यस्थितीत या उद्योगास सिडको व एमएमआरडीए चे कर भरावे लागत आहेत. परंतु, या क्षेत्राचा समावेश आता पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये झाला असल्याने ५० कोटीपेक्षा अधिक उलाढाल असणाऱ्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर भरावा लागणार आहे. महापालिकेच्या हद्दीमध्ये असलेल्या आयर्न अँड स्टिल उद्योगांचे डेपो, सर्विस सेंटर यापूर्वी पनवेल ग्रामपंचायत हद्दीत समाविष्ट असल्याने त्यांना कोणत्याही प्रकारचा कर लागू होत नव्हता. आता तो लागू होत आहे. त्यामुळे स्टील मार्केटमध्ये कोणतीही प्रक्रिया न करणारे आणि केवळ व्यापार करणाऱ्या व्यावसायिकांना लोखंड व पोलाद आणि त्यासंबंधित वस्तूंवरील स्थानिक संस्था कराच्या आकारणीतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

१६ मार्च २०१७

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासंदर्भात निर्णय

## अधिकारी-कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन व भत्त्यांसह निवृत्तीवेतनाच्या दायित्वाची राज्य शासनामार्फत स्वीकृती

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला उर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी या प्राधिकरणातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन व भत्त्यांचे दायित्व तसेच सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतनाचे दायित्व राज्य शासनामार्फत स्वीकारण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्वायत्त होण्यापूर्वी शासकीय संस्था म्हणून कार्यरत होते. त्यावेळी नियुक्त झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्ती वेतनाचा भार राज्य शासनामार्फत उचलण्यात येणार आहे. तसेच या प्राधिकरणास स्वायत्तता मिळाल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात नियुक्त झालेल्या अधिकारी-कर्मचारी यांचे नियमित वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतन हे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीमधून भागविण्यात येणार आहे. यासाठी विभागस्तरावर स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करून दरवर्षी त्यामध्ये आवश्यकतेनुसार निधीची तरतूद करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्राधिकरणातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली. प्राधिकरणातील अधिकाऱ्यांच्या व अभियंत्यांच्या सेवाविषयक बाबी शासन स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत हाताळण्यात येतील. मात्र, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न शासनाकडे जमा करावे लागणार आहे.

राज्यातील नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा आणि मल:निस्सारण कार्यक्रमांचा जलद गतीने विकास व विनियमन करण्याच्या अनुषंगाने अधिनियम १९७६ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर नगर विकास विभागाच्या अखत्यारित असलेल्या परिसर अभियांत्रिकी विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी मत्ता व दायित्वासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आले. नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी, योजनांचे दैनंदिन परिचलन व देखभाल दुरुस्ती, प्रकल्प सल्लागार सेवा, खाजगी सहभागाचे प्रकल्प, सनियंत्रण व संशोधन विकास आणि प्रशिक्षण, गुणवत्ता परीक्षण इत्यादी प्रकारची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आली आहेत. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील खर्च देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उत्पन्नामधून करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राप्त होत असलेले ई.अँड पी. शुल्क वारंवार कमी होत असल्याने प्राधिकरणातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते तसेच निवृत्तीवेतन यावरील खर्च भागविण्यासंदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणापुढे अडचण निर्माण झाली होती. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियमातील कलम २७ व २८ नुसार शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला आर्थिक सहाय्य करण्याची तरतूद आहे. यानुसार आजचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

१७ मार्च २०१७

वित्त विभाग

**विनियोजन विधेयक विधानमंडळास**

**सादर करण्याचा निर्णय**

सन २०१७-१८ ची अर्थसंकल्पीय प्रकाशने आणि त्यास अनुसरून महाराष्ट्र (लेखानुदान) विनियोजन विधेयक २०१७ आणि महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०१७ विधानमंडळास सादर करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

-----०-----

१८ मार्च २०१७

वित्त विभाग

**अर्थसंकल्पीय भाषणास मान्यता**

राज्याच्या वित्तमंत्र्यांकडून विधानमंडळात सादर करण्यात येणाऱ्या २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय भाषणास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

२३ मार्च २०१७

गृह विभाग

पोलीस गृहनिर्माण महामंडळामार्फत कार्यवाही

**घरबांधणीसाठी कर्ज घेऊन पोलिसांना वितरण करण्यास मंजुरी**

राज्याच्या पोलीस दलातील विविध संवर्गात कार्यरत कर्मचाऱ्यांना घर बांधणी अग्रिमासाठी बँकांकडून कर्ज घेऊन कर्मचाऱ्यांना त्याचे वितरण करण्याची परवानगी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास देण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या निर्णयानुसार आवश्यकतेप्रमाणे करारनामा करण्यास गृह विभाग, पोलीस गृहनिर्माण महामंडळ व पोलीस महासंचालक यांना प्राधिकृत करण्यास देखील मान्यता देण्यात आली आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी नवीन पदाची निर्मिती न करता प्रशासकीय यंत्रणा प्राधिकृत व निर्माण करण्यात येणार आहे. घरबांधणी अग्रिमासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या व्याजातील फरकापोटी अंदाजित ३० कोटी प्रतिवर्ष देण्यासही यावेळी मान्यता देण्यात आली.

-----०-----

२३ मार्च २०१७
सामान्य प्रशासन विभाग

**महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाला**
**कल्याण केंद्राच्या बांधकामासाठी १० कोटींचा निधी**

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या मुंबई उपनगर येथील कल्याण केंद्राच्या इमारत बांधकामासाठी शासनाकडून विशेष बाब आणि एक वेळची मदत (One Time Aid) म्हणून १० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याच्या नवीन योजनेस आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

शासन मान्यता प्राप्त असलेल्या महासंघास महसूल व वन विभागाकडून प्राप्त झालेला मुंबई उपनगर येथील सर्व्हे क्र. ३४१, न.भू.क्र. ६२९ मधील ई क्षेत्र १३८१ चौ.मी. एवढ्या भूखंडावर कल्याण केंद्राच्या इमारतीच्या बांधकामासाठी शासनाकडून विशेष बाब आणि एक वेळची मदत (One Time Aid) म्हणून १० कोटी उपलब्ध करुन देण्याच्या नवीन योजनेस आज मंजुरी देण्यात आली. ही बाब पूर्वोदाहरण म्हणून समजण्यात येणार नाही. याकामी २०१७-१८ मध्ये करण्यात आलेली १० कोटींची तरतूद अर्थसंकल्पीय करुन मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार आहे.

-----o-----

२३ मार्च २०१७
महसूल विभाग

**राष्ट्रीय औषध निर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्थेसाठी**
**काळडोंगरी येथील २४.५२ हेक्टर जागा देण्याचा निर्णय**

राष्ट्रीय औषध निर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च) स्थापन करण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील काळडोंगरी येथे २४.५२ हेक्टर जागा उपलब्ध करुन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

केंद्र शासनाच्या रसायन व उर्वरक मंत्रालयांतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या औषध निर्माणशास्त्र शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातील गुणवत्ता व निपुणता ही संवर्धित आणि विकसित करण्यात येणार आहे. रसायन व उर्वरक मंत्रालयाच्या विनंतीनुसार राज्य शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ चे कलम ३८ व ४० अन्वये ३० वर्षांसाठी वार्षिक नाममात्र एक रुपया भुईभाडे दराने जागा उपलब्ध करुन दिली आहे. या भाडेपट्ट्याचे वेळोवेळी त्याच तत्त्वावर नूतनीकरण करण्याची तरतूदही या करारामध्ये करण्यात आली आहे. या संस्थेच्या स्थापनेमुळे महाराष्ट्रातील औषधनिर्माण क्षेत्रातील प्रगतीला चालना मिळणार आहे.

----o----

२३ मार्च २०१७
महसूल विभाग

**जमिनीचा अनधिकृत अकृषिक वापरासह तिच्या प्रयोजनात बदलासाठी दंड आकारणीचे धोरण ३१ मार्च २०१८ पर्यंत कायम**

सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी न घेता जमिनीचा अनधिकृतरित्या अकृषिक वापर केल्यास अथवा तिच्या वापराचे प्रयोजन बदलल्यास दंड आकारणीचे धोरण निश्चित करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी ३१ मार्च २०१८ पर्यंत करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

विविध अकृषिक कारणांच्या जमिनींवर अनधिकृत बांधकाम करण्याची वृत्ती सातत्याने आढळते. अशा अनधिकृत वापरासाठी अथवा वापराच्या कारणांमध्ये बदल केल्यास संबंधित नागरिकांना कर आकारणीसाठी नोटिसा देण्यात येतात. मात्र, अनेकदा या प्रकरणांमध्ये महसूल अधिकाऱ्यांवर दंड आकारणी कमी किंवा अधिक करण्याबाबत गैरप्रकाराचे आरोप होतात किंवा दंडाची रक्कम कमी करण्यासाठी अपील दाखल केले जाते. या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय अधिकाऱ्यांना धोरणात्मक आणि अधिक स्पष्ट निर्देश देण्यासाठी दंडाच्या रकमेचे नवीन धोरण निश्चित करण्यात आले आहे. या धोरणानुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ मधील कलम ४५ अन्वये व महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ च्या नियम ८ खाली दंडाची आकारणी करण्यात येते.

यानुसार, शेत जमिनीचा अकृषिक वापर करण्यासाठी सक्षम महसूल प्राधिकाऱ्यांची किंवा संबंधित नियोजन प्राधिकरणाची मंजुरी घेतली नसेल तर अकृषिक आकारणीच्या ४० पट दंड होईल. तर सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी नाही परंतु संबंधित नियोजन प्राधिकरणाची मंजुरी असेल तर अकृषिक आकारणीच्या २० पट दंड आकारणी होईल.

तसेच विशिष्ट प्रयोजनासाठी अकृषिक वापराकरिता सक्षम महसूल प्राधिकाऱ्यांनी मंजुरी दिलेल्या जमिनींवर मूळ प्रयोजन सोडून इतर प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करताना सक्षम प्राधिकाऱ्याची अथवा संबंधित नियोजन प्राधिकरणाची मंजुरी घेतली नसल्यास अकृषिक आकारणीच्या ४० पट दंड आकारण्यात येईल. तर, विशिष्ट प्रयोजनासाठी अकृषिक वापराकरीता सक्षम महसूल प्राधिकाऱ्यांनी मंजुरी दिलेल्या जमिनींवर मूळ प्रयोजन सोडून इतर प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करताना सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी नसेल मात्र संबंधित नियोजन प्राधिकरणाची मंजुरी असल्यास अशा प्रकरणांत अकृषिक आकारणीच्या २० पट दंड आकारण्यात येईल.

या धोरणाची अंमलबजावणी फक्त ३१ मार्च २०१८ पर्यंत करण्यात येणार आहे. या कालावधित दंडाची रक्कम भरणा न केल्यास अकृषिक आकारणीच्या सरसकट ४० पट इतक्या दराने दंड भरावा लागणार आहे. धोरणास मुदतवाढ द्यावयाची असल्यास ३१ मार्च २०१८ नंतर आढावा घेऊन यथोचित निर्णय घेण्यात येईल.

----o----

२३ मार्च २०१७
उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीसाठी लेखा अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यास मान्यता

राज्यात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीसाठी (राष्ट्रीय विधी विद्यापीठ) आवश्यक वित्त व लेखा अधिकाऱ्यांची एकूण तीन पदे निर्माण करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यात मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी (राष्ट्रीय विधी विद्यापीठ) स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने यापूर्वीच मान्यता दिली आहे. या विद्यापीठातील लेखा अधिकाऱ्यांची संवैधानिक पदे निर्माण करण्यास आणि या पदांसाठी येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

२३ मार्च २०१७
विधि व न्याय विभाग

## हिंगणघाट येथे जिल्हा व सत्र न्यायालयासह दिवाणी न्यायालय स्थापन्यास मान्यता

वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे हिंगणघाट व समुद्रपूर या तालुक्यांसाठी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

उच्चस्तर सचिव समितीच्या मान्यतेने या न्यायालयांसाठी आवश्यक पदनिर्मिती करण्यासदेखील मान्यता देण्यात आली असून यापैकी दोन्ही न्यायालयांकरिता पहारेकरी किंवा सुरक्षारक्षक व सफाईगार या पदांची कामे बाह्ययंत्रणेद्वारे करुन घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच या पदांसाठीच्या खर्चासदेखील मान्यता देण्यात आली आहे.

-----०-----

२३ मार्च २०१७
महसूल विभाग

<u>भाडेपट्टा किंवा कब्जेहक्कासंदर्भात निर्णय</u>

## शासकीय जमिनींच्या पुनर्विकासासह अधिमूल्य आकारणीच्या नवीन धोरणास मंजुरी

शासनाने विविध कारणांसाठी ५० वर्षे, ९९ वर्षे, ९९९ वर्षे अशा दीर्घ मुदतीसाठी भाडेपट्ट्याने किंवा कब्जेहक्काने जमिनी दिलेल्या आहेत. अशा शासकीय जमिनींचा पुनर्विकास करण्यासाठी परवानगी देण्यासह अधिमूल्य आकारणीबाबतच्या नवीन धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

दीर्घ मुदतीने मिळालेल्या जमिनींवर बांधलेल्या इमारती मोडकळीस आल्यावर नवीन इमारती बांधण्याकरिता, तसेच जमिनी वापराच्या प्रयोजनांमध्ये बदल करण्याकरिता अथवा इतर प्रयोजनांसाठी शासनाकडे प्रस्ताव प्राप्त होतात. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ चे कलम ३७ अ अन्वये असलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने नवीन धोरण ठरविण्यात आले आहे. या धोरणाबरोबरच सर्व अटी आणि शर्तींच्या अधीन राहून शासकीय जमिनींच्या पुनर्विकासाला आता मान्यता देण्यात येईल.

पुनर्विकासासाठी प्रचलित विकास आराखडा किंवा प्रादेशिक विकास आराखडा व संबंधित विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत असा पुनर्विकास अनुज्ञेय असल्याची प्रथम खातरजमा करण्यात येईल. मुंबईमध्ये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम ३३ (९) व ३३ (१०) हे विनियम वगळता पुनर्विकासास परवानगी देताना निवासी किंवा वाणिज्यिक किंवा औद्योगिक प्रयोजनासाठी प्रचलित वार्षिक दराच्या आधारे या जमिनीच्या बाजार मूल्याच्या २५ टक्के दराने आणि शैक्षणिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी बाजार मूल्याच्या १२.५ टक्के दराने अधिमूल्य आकारण्यात येणार आहे. राज्यातील अन्य भागातही याप्रमाणे अधिमूल्य आकारण्यात येईल. जमीन प्रदानाच्या मूळ मंजूर प्रयोजनात बदल होणार असेल तर पुनर्विकासाचे अधिमूल्य आणि अशा बदलासाठी प्रचलित धोरणाप्रमाणे स्वतंत्रपणे अधिमूल्यही आकारले जाणार आहे.

पुनर्विकास प्रकरणांमध्ये मूळ भाडेपट्टेधारक किंवा भोगवटादाराचे दायित्व संबंधित विकासक किंवा नियोजन संस्थेला स्वीकारावे लागेल. तसेच संबंधित नियोजन प्राधिकरणांची मान्यता प्राप्त करणे, आवश्यक तेथे हेरिटेज कमिटीची ना हरकत प्राप्त करणे देखील आवश्यक राहणार आहे. यासह इतरही तरतुदींचा या धोरणामध्ये समावेश करण्यात आला आहे.

----०----

३० मार्च २०१७

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ**

**भागभांडवलात २०० कोटींच्या वाढीस मान्यता**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील तरूणांना आर्थिक सहाय्य पुरविण्याच्यादृष्टीने स्थापन झालेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे भागभांडवल २०० कोटी रूपयांनी वाढविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे महामंडळाच्या भागभांडवलात ४०० कोटींनी वाढ झाली आहे.

राज्यातील जास्तीत जास्त तरूणांनी उद्योग सुरू करावेत, त्यांना भागभांडवलाची कमतरता पडू नये यासाठी राज्य शासनाने आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील तरूणांसाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले आहे. या माध्यमातून तरूणांना स्वयंरोजगार तथा उद्योग उभारणीसाठी बीज भांडवल, खेळते भांडवल तसेच थेट कर्ज पुरवठा करण्यात येतो. आतापर्यंत या महामंडळास शासनाकडून ५० कोटींचे भागभांडवल मंजूर करण्यात आले आहे. राज्य शासनाने २०१६-१७ च्या हिवाळी अधिवेशनात २०० कोटी आणि २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात २०० कोटी भागभांडवल मंजूर केले आहे. अशाप्रकारे महामंडळाच्या योजनांना गती देण्यासह त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या भागभांडवलात ४०० कोटी रूपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----o-----

३० मार्च २०१७

पणन विभाग

**कांदा उत्पादक शेतकऱ्यांना**

**प्रति क्विंटल शंभर रूपये देणार**

राज्यात २०१५-१६ मध्ये कांद्याचे उत्पन्न वाढल्याने दरात मोठी घसरण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी जुलै व ऑगस्ट २०१६ या महिन्यात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १०० रूपये अनुदान देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या योजनेसाठी साडे त्र्येचाळीस कोटी रुपयांचा निधी आकस्मिकता निधीमधून देण्यात येणार आहे.

राज्यातील कांदा उत्पादकांना आर्थिक मदत देण्यासाठी राज्य शासनाने अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. जुलै व ऑगस्ट २०१६ या महिन्यांत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १०० रूपयांप्रमाणे व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी अनुदान देण्यात येणार आहे. ही योजना मुंबई बाजार समिती वगळता राज्यातील सर्व कृषी बाजार समित्यांसाठी असून परराज्यातून आवक झालेल्या व व्यापाऱ्यांच्या कांद्यासाठी ही योजना लागू राहणार नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी योग्य कागदपत्रांसह कृषी समित्यांकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

-----o-----

३० मार्च २०१७

वन विभाग

## केंद्र शासनाची नगर वन उद्यान योजना राज्यात राबविण्यास मान्यता

नागरी क्षेत्रात आरोग्यदायी पर्यावरण निर्माण करण्यासह शहरांचे सौदर्य, स्वच्छता व हिरवाई वृद्धिंगत करण्यासाठी तसेच त्यांच्या नियोजनबद्ध विकासासाठी देशातील सर्व महानगरपालिका आणि वर्ग-१ दर्जाच्या नगरपालिकांच्या शहरांमध्ये किमान एक वन उद्यान विकसित करण्यासाठी केंद्र सरकारने नगर वन उद्यान ही योजना सुरु केली आहे. ही योजना २०१६-१७ पासून राज्यात राबविण्यासह राज्य हिस्स्याच्या २० टक्के रकमेस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

या योजनेची पुढील ५ वर्षात टप्प्याटप्याने सर्व महानगरपालिका व वर्ग-१ दर्जाच्या नगरपालिकांच्या क्षेत्रातील वन किंवा वनेतर क्षेत्रात वन विभागामार्फत अंमलबजावणी केली जाणार आहे. या कार्यक्रमांतर्गत विविध प्रजातींची वृक्ष लागवड करणे, कुंपन घालणे, निसर्ग पाऊलवाटा, जॉगिंग व सायकल ट्रॅक उभारणे, नागरी सुविधा, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, आसन व्यवस्था इत्यादी कामे करण्यात येणार आहेत. ही योजना केंद्र पुरस्कृत असून त्यामध्ये केंद्राचा हिस्सा ८० टक्के असून राज्याचा हिस्सा २० टक्के राहणार आहे. त्यासाठी येणाऱ्या १० कोटी २० लाख एवढ्या आर्थिक भारास मान्यता देण्यात आली.

-----o-----

३० मार्च २०१७

महसूल विभाग

## अकृषिक आकारणीच्या वसुलीवरील स्थगिती उठविली
## सुधारित प्रमाणदराने वसुलीस मंजुरी

राज्यात सुधारित प्रमाणदराच्या आधारे अकृषिक आकारणीच्या वसुलीस देण्यात आलेली स्थगिती उठविण्यास तसेच अकृषिक आकारणीच्या प्रमाणदरात सुधारणा करुन अकृषिक आकारणीची वसुली करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्य शासनास प्राप्त होणाऱ्या महसुलाच्या मुख्य स्त्रोतांपैकी अकृषिक आकारणी हा एक स्त्रोत आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील अकृषिक आकारणीच्या प्रमाणदरासंबंधी करण्यात आलेल्या तरतुदीनुसार अकृषिक आकारणीचे प्रमाणदर हे प्रत्येक पाच वर्षांच्या हमी कालावधीसाठी सुधारित करणे आणि त्यापुढील पाच वर्षांच्या वाढीव कालावधीसाठी त्यास मुदतवाढ देणे किंवा पुन्हा सुधारित करणे आवश्यक आहे. मात्र, अकृषिक आकारणीचे प्रमाणदर निश्चित करुन त्यानुसार वसुली करण्यास अडचणी येत असल्याने वारंवार स्थगिती देण्यात आली होती.

ही स्थगिती उठविण्यास तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ११३ च्या पोट कलम (२ क) मध्ये तसेच कलम ३२८ व कलम ३२९ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९ च्या नियम १६ (३) मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. अकृषिक आकारणीच्या प्रमाणदरांची निश्चिती करताना बाजारमुल्यातील मोठ्या दरवाढीचा फटका जनतेला बसू नये, यासाठी सुधारणा करुन त्यानुसार पुनर्निश्चिती करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

-----o-----

३० मार्च २०१७
पदुम विभाग

## बैलगाडा शर्यती अधिनियमामध्ये सुधारणेसाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन

राज्यात बैलगाडा शर्यतींना मान्यता देण्यासाठी केंद्र शासनाच्या प्राणी क्लेष प्रतिबंधक अधिनियम १९६० मध्ये आवश्यक त्या सुधारणा करता याव्यात म्हणून सविस्तर व सर्वंकष अभ्यास करण्यासाठी पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

या उपसमितीमध्ये पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री यांच्यासह इतर दोन मंत्री असणार आहेत. या समितीला अधिनियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे, बैलगाडा शर्यतीसाठी आवश्यक त्या अटी व शर्ती निश्चित करणे तसेच इतर अनुषंगिक बाबींचा अभ्यास करून विधिमंडळात मांडावयाचा विधेयकाचा अंतिम मसुदा तयार करण्याचे अधिकार देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या समितीने तयार केलेल्या मसुद्यानुसार विधेयक मांडण्याची कार्यवाही पशुसंवर्धन आणि विधि व न्याय विभागाने करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या प्राणी क्लेष प्रतिबंधक अधिनियम १९६० च्या कलम २२ मध्ये प्राण्यांच्या प्रदर्शन, प्रशिक्षण तसेच त्यांचे कार्यकौशल्य प्रदर्शित करण्यावर निर्बंध घालण्याचे अधिकार केंद्र शासनास आहेत. यामध्ये बैलगाडा शर्यतींना प्रदर्शन व प्रशिक्षणाच्या निर्बंधातून सूट घेण्याची तरतूद समाविष्ट करण्यासाठी विधिमंडळात सुधारणा विधेयक ठेवण्यासाठी ही समिती नेमण्यात आली आहे.

-----o-----

३० मार्च २०१७
महसूल विभाग

## शेतजमिनी भाडेपट्ट्याने देता येण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यास मान्यता

निती (NITI) आयोगाने प्रस्तावित केलेल्या आदर्श प्रारुपानुसार राज्यात शेतजमिनी कृषी व कृषी पूरक बाबींसाठी भाडेपट्ट्याने देणे शक्य होण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

निती आयोगाकडून विविध राज्यातील कुळ कायद्यांचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ समिती नेमण्यात आली होती. या समितीने कृषी क्षेत्राची कार्यक्षमता वाढविण्यासाठी शेतजमिनी भाडेपट्ट्याने देणे कायदेशीर व्हावे यासाठी आदर्श कायद्याचे प्रारुप सादर केले आहे. आयोगाच्या प्रारुप कायद्यामध्ये राज्यात आवश्यक असलेल्या सुधारणा करुन राज्यात हा कायदा लागू करणे प्रस्तावित आहे. यामुळे कृषी क्षेत्रातील भूमिहीन व अल्पभूधारक व्यक्तींना शेतीसाठी जमीन उपलब्ध होणार आहे. यामुळे राज्यातील शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढून उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे.

या विधेयकाचे प्रारुप विधि व न्याय विभागाच्या सल्ल्याने अंतिम करुन विधिमंडळासमोर मांडण्यात येणार आहे. विधेयक मंजूर झाल्यानंतर भाडेपट्ट्याचा करारनामा नोंदणीसाठी १०० रुपये नोंदणी फी घेणे आणि अशा भाडेपट्टा करारनाम्यासाठी १०० रुपये मुद्रांक शुल्क आकारण्यासाठीची सवलत देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

-----o-----

३० मार्च २०१७
महिला व बाल विकास विभाग

## कुपोषणावर मात करण्यासाठी आदर्श अंगणवाडी योजनेस मान्यता

राज्यातील अंगणवाड्यांमधील पायाभूत सुविधांमध्ये वाढ करुन कुपोषणावर मात करण्यासाठी आदर्श अंगणवाडी योजनेस आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

अंगणवाडीतील (०-६ वर्षे) बालकांच्या भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासाबरोबरच त्यांना आनंददायी वातावरणात शिक्षण व पोषण आहार देण्यासाठी २०१७-१८ पासून टप्प्याटप्प्याने अंगणवाडी केंद्राचे रुपांतर आदर्श अंगणवाडी केंद्रामध्ये करण्यात येणार आहे. याअंतर्गत आदर्श अंगणवाड्यांमध्ये सौर ऊर्जा संच सुविधा, अंगणवाडीच्या भिंती-दरवाजे-सिलिंग-फ्लोअर यांना शैक्षणिक साधन बनविणे, ई-लर्निंगसाठी पायाभूत सुविधा, टेबल-खुर्च्या, वॉटर प्युरिफायर, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, मुलांसाठी स्वच्छता कीट, हाईट मेजरमेंट टेप आणि स्थानिक साहित्यावर आधारित शैक्षणिक साहित्य आदी बाबी पुरविण्यात येणार आहेत. त्यासाठी एका अंगणवाडीस १ लाख ६५ हजार रुपये देण्यात येतील. या योजनेनुसार राज्यात प्रत्येक वर्षी किमान ५ हजार अंगणवाड्या आदर्श अंगणवाड्यांत रुपांतरित करण्यात येणार आहेत. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात किमान १४४ अंगणवाड्या आणि प्रति प्रकल्प किमान १० अंगणवाड्या रुपांतरित केल्या जातील.

आदर्श अंगणवाडी योजनेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पहिल्या तीन प्रकल्पांना जिल्हा आणि राज्य स्तरावर रोख पारितोषिकाने गौरविण्यात येणार आहे. योजनेंतर्गत दरवर्षी सुमारे ८५ कोटी एवढा अतिरिक्त नियतव्यय महिला व बाल विकास विभागास उपलब्ध करुन देण्यासही मान्यता देण्यात आली.

-----o-----

३० मार्च २०१७
महसूल विभाग

## टीडीआरला अचल मालमत्ता म्हणून घोषित करण्यासाठी समिती

हस्तांतरणीय विकास हक्कास अचल मालमत्ता म्हणून घोषित करण्याच्या प्रस्तावाच्या कायदेशीर बाबी व आर्थिक परिणामांचा सखोल अभ्यास करून शासनास अहवाल सादर करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयानुसार महसूल, नगर विकास आणि विधि व न्याय या विभागाच्या प्रधान सचिवांची समिती स्थापन करण्यात येणार आहे. त्यानंतर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम-२ (त क) मध्ये तसेच अनुसूची-१ मधील अनुच्छेद २५ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

महानगरपालिका व अन्य नियोजन प्राधिकरणांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये हस्तांतरणीय विकास हक्क (Transferable Development Rights -TDR) ही संकल्पना समाविष्ट करण्यात आली आहे. टीडीआर प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जमीन मालक आणि महानगरपालिका यांना आपली जमीन हस्तांतरित करताना भराव्या लागणाऱ्या दस्तावेजासाठीचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे. टीडीआर प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सदर प्रमाणपत्र त्रयस्थ व्यक्तीस हस्तांतरित करताना तयार होणाऱ्या दस्तास जंगम मालमत्ता समजण्यात येते.

त्यानुसार या दस्तास तीन टक्के या दराने मुद्रांक शुल्क आकारणी करण्यात येते. हस्तांतरण दस्त ही जंगम मालमत्ता गृहीत धरण्यात येत असल्यामुळे शासनाचे नुकसान होत आहे.

टीडीआर हा स्थावर मालमत्ता म्हणून गृहीत धरण्याचा निवाडा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला आहे. टीडीआर स्थावर मालमत्ता म्हणून गृहीत धरल्यास त्या संबधित दस्तांना निर्धारित बाजारमूल्यावर स्थानपरत्वे चार किंवा पाच टक्के मुद्रांक शुल्क तसेच एक टक्के दराने स्थानिक संस्था कर देखील वसूल करता येणार आहे. या सर्व बाबींचा विचार करुन टीडीआर हा स्थावर मालमत्तेचा प्रकार असल्याबाबत स्पष्टीकरण व तरतूद महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात समाविष्ट करण्यात येईल. तसेच त्यानुसार मुद्रांक शुल्काची वसुली करण्याबाबतची सुधारणा करणे शक्य होईल. त्यादृष्टीने समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर हा प्रस्ताव फेरसादर करण्यास मान्यता देण्यात आली.

-----०-----

३० मार्च २०१७

महसूल विभाग

## मुद्रांक शुल्क वसुलीच्या कार्यपद्धतीत सुटसुटीतपणा आणण्यासाठी अधिनियमात सुधारणा

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम १० ड व कलम ३० अ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीच्या कार्यपद्धतीमध्ये सुटसुटीतपणा आणण्यासाठी सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या अधिनियमातील सुधारणा करण्यासाठी विधेयकाचे प्रारुप विधानमंडळासमोर मांडण्यासही मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम २०१३ अन्वये व महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अधिनियम २०१५ अन्वये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये कलम ३० अ व १० ड ही नवीन कलमे समाविष्ट करण्यात आली आहेत. यापैकी कलम १० ड नुसार शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, निमशासकीय संघटना, बँक व्यावसायिक व बँकेतर वित्तीय संस्था यांनी त्यांच्या कामकाजाशी संबंध येणाऱ्या दस्तावेजांपैकी शासनाने अधिसूचित केलेल्या दस्तांना देय असणारे योग्य मुद्रांक शुल्क भरले असल्याची खात्री करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच या संस्थांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांवर ई-प्रदान पडताळण्याची, त्याचे विरुपण करण्याची व दस्तऐवजावर प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे कलम ३० अ नुसार बँक, बँकेतर कंपनी, गृहनिर्माण वित्त कंपनी किंवा तत्सम संस्था यांच्यावर त्यांच्या लाभात हक्क निर्माण करणारा कोणताही दस्तावेज निष्पादित झाल्यास त्या दस्ताचे मुद्रांक शुल्क भरण्याचे दायित्व सोपविण्यात आले आहे.

-----०-----

३० मार्च २०१७

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## कोल्हापूर येथे संजय घोडावत युनिव्हर्सिटी या स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठाची स्थापना

कोल्हापूर जिल्ह्यातील आतिग्रे (ता. हातकणंगले) येथे संजय घोडावत युनिव्हर्सिटी या स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठाची स्थापना २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या विद्यापीठासंदर्भात विधानमंडळासमोर सादर करावयाच्या विधेयकाच्या मसुद्यासही मान्यता देण्यात आली.

प्रस्तावित प्रायोजक संस्थेला शासकीय जमीन मोफत अथवा सवलतीच्या दराने देण्यात आलेली नाही. संबंधित संस्थेने या विद्यापीठासाठी दर्शविलेली जमीन खाजगी असून त्यांनी स्वत: विकत घेतलेली आहे. या विद्यापीठास सवलतीच्या दरात वीज, पाणी व इतर मालमत्ता करात तसेच भविष्यात सवलतीच्या दरात जमीन देण्यास परवानगी असणार नाही. विद्यापीठामध्ये गुणवत्तेच्या आधारावर प्रवेश देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या आरक्षित जागांवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक शुल्क व इतर सवलतींवर होणाऱ्या खर्चाचा भार शासनावर येणार नाही. अशा विविध तरतुदी या विधेयकात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

-----०-----

३० मार्च २०१७

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## पुणे येथे डिएसके वर्ल्ड युनिव्हर्सिटी या स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठाची स्थापना

पुणे जिल्ह्यातील फुरसुंगी येथे डिएसके वर्ल्ड युनिव्हर्सिटी या स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठाची स्थापना २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या विद्यापीठासंदर्भात विधानमंडळासमोर सादर करावयाच्या विधेयकाच्या मसुद्यासही मान्यता देण्यात आली.

प्रस्तावित प्रायोजक संस्थेला शासकीय जमीन मोफत अथवा सवलतीच्या दराने देण्यात आलेली नाही. संबंधित संस्थेने या विद्यापीठासाठी दर्शविलेली जमीन खाजगी असून त्यांनी स्वत: विकत घेतलेली आहे. या विद्यापीठास सवलतीच्या दरात वीज, पाणी व इतर मालमत्ता करात तसेच भविष्यात सवलतीच्या दरात जमीन देण्यास परवानगी असणार नाही. विद्यापीठामध्ये गुणवत्तेच्या आधारावर प्रवेश देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या आरक्षित जागांवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक शुल्क व इतर सवलतींवर होणाऱ्या खर्चाचा भार शासनावर येणार नाही. अशा विविध तरतुदी या विधेयकात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

-----०-----

३० मार्च २०१७

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**पुणे येथे विश्वकर्मा युनिव्हर्सिटी**
**या स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठाची स्थापना**

पुणे जिल्ह्यातील कोंढवा येथे विश्वकर्मा युनिव्हर्सिटी या स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठाची स्थापना २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या विद्यापीठासंदर्भात विधानमंडळासमोर सादर करावयाच्या विधेयकाच्या मसुद्यासही मान्यता देण्यात आली.

प्रस्तावित प्रायोजक संस्थेला शासकीय जमीन मोफत अथवा सवलतीच्या दराने देण्यात आलेली नाही. संबंधित संस्थेने या विद्यापीठासाठी दर्शविलेली जमीन खाजगी असून त्यांनी स्वत: विकत घेतलेली आहे. या विद्यापीठास सवलतीच्या दरात वीज, पाणी व इतर मालमत्ता करात तसेच भविष्यात सवलतीच्या दरात जमीन देण्यास परवानगी असणार नाही. विद्यापीठामध्ये गुणवत्तेच्या आधारावर प्रवेश देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या आरक्षित जागांवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर त्यांच्या शैक्षणिक शुल्क व इतर सवलतींवर होणाऱ्या खर्चाचा भार शासनावर येणार नाही. अशा विविध तरतुदी या विधेयकात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

-----o-----

३० मार्च २०१७

नगर विकास विभाग-१

**बेकायदेशीर बांधकामांना आळा घालण्यासाठी**
**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमात सुधारणा**

राज्याच्या नागरी भागातील बेकायदेशीर बांधकामांना आळा घालण्यासाठी प्रस्तावित सुधारित धोरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलमांमध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

ग्रामीण भागातील अनधिकृत बांधकामांसंबंधित विविध कायद्यांमध्ये यापूर्वी सुधारणा केल्या आहेत. नागरी भागातील अनधिकृत बांधकामे नियमितीकरणासंदर्भात तसेच यापुढे अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई होण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमातील संबंधित कलमांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रारुप विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर करण्यास देखील मान्यता देण्यात आली.

अनधिकृत बांधकाम नियमित करण्याबाबत ३१ डिसेंबर २०१५ पर्यंतची कट-ऑफ तारीख विचारात घेण्यास मान्यता देण्यात आली. याप्रमाणे सुधारणा झाल्यानंतर अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन मिळणार नसल्याबाबत विभागाने दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच अटी-शर्ती विहित करताना नियमित बांधकाम करणाऱ्यांवरही अन्याय होणार नसल्याची दक्षता घेण्यात येणार आहे.

-----o-----

३० मार्च २०१७
जलसंपदा विभाग

**टाकळी-कलान लघुपाटबंधारे प्रकल्पास**
**११७ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता**

अमरावती जिल्ह्यातील टाकळी-कलान बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प (ता. भातकुली) प्रकल्पाच्या ११७ कोटी १० लाख रुपयांच्या किंमतीस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पाच्या १८.२१ कोटी इतक्या किंमतीस २००९ मध्ये मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात २०११ मध्ये सुरू झाले असून प्रकल्पाची ९८.८९ कोटी इतकी किंमत वाढ होऊन ती ११७.१० कोटी झाली आहे. दरसूचीमध्ये झालेली वाढ, भूसंपादनातील वाढ, जास्त दराची निविदा, संकल्पचित्रातील बदल, मूळ प्रकल्प अहवालातील अपुऱ्या तरतुदी आणि अनुषंगिक खर्च यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. प्रकल्पाचे भौतिक काम जवळजवळ ७० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम पूर्ण झाल्यानंतर अमरावती जिल्ह्यातील १२५० हेक्टर रब्बी क्षेत्राचा अनुशेष दूर होणार आहे. यामुळे आसपासच्या भागात भूजल पातळी वाढण्यास देखील मदत होणार आहे. तसेच संकल्पचित्रातील बदलामुळे १६.४१ टक्के झालेली वाढ १५ टक्क्यांपेक्षा फारच कमी प्रमाणात जास्त असल्याने ती मान्य करण्यात आली आहे.

-----०-----

३० मार्च २०१७
संसदीय कार्य विभाग

**विधानमंडळ सदस्य अधिनियमामध्ये**
**शासकीय मुख्य प्रतोद या पदाचा समावेश**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सत्ताधारी पक्षाचे शासकीय मुख्य प्रतोद हे पद महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) अधिनियम १९५६ मधील कलम २ मध्ये समाविष्ट करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

अधिनियमाच्या कलम २ मधील अनुसूची एकमध्ये क्रमांक २२ नंतर नवीन नोंद क्रमांक २३ समाविष्ट करण्यात आली आहे. त्यानुसार क्र. २३ मध्ये महाराष्ट्र विधानमंडळाच्या विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहातील शासकीय मुख्य प्रतोद अशी नोंद होणार आहे.

सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सदस्यांची निश्चित गणसंख्या ठेवणे आणि सत्तारुढ पक्षाच्या ध्येयधोरणांची सभागृहात प्रभावीपणे अंमलबजावणी करणे ही कार्ये शासकीय मुख्य प्रतोद पार पाडत असतात. त्यांचे कार्य परिणामकारकपणे पार पाडता येण्यासाठी त्यांना सुविधा देता याव्यात यासाठी ही नवीन नोंद समाविष्ट करण्यात येणार आहे.

-----०-----

३० मार्च २०१७
महसूल विभाग

<u>ठाणे जिल्ह्यातील इतर संस्थांनाही लाभ</u>

## अंबरनाथच्या सूर्योदय सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या शासकीय जमिनीवरील शर्तभंग नियमित

अंबरनाथ (जि.ठाणे) येथील सूर्योदय सहकारी गृहनिर्माण संस्थेस निवासी वापरासाठी पूर्वी वितरित करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील शर्तभंग विशेष बाब म्हणून नियमित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या संस्थेसह ही योजना ठाणे जिल्ह्यातील यासारख्या इतर सहकारी गृहनिर्माण संस्थांनाही लागू करण्यात येणार आहे.

शर्तभंग नियमितीकरणाची योजना यापूर्वी झालेल्या हस्तांतरणासाठी आणि फक्त ३ वर्ष कालावधीसाठी लागू असणार आहे. ही योजना विशेष बाब असल्याने संबंधित संस्थेच्या सभासदांनी यापूर्वी प्रचलित नियमानुसार प्रकरणपरत्वे शर्तभंग नियमित करुन घेतले असल्यास त्यांना या निर्णयाचा आधार घेऊन शासनास भरणा केलेली रक्कम परत मागता येणार नाही. या नवीन योजनेनुसार संस्थेच्या मूळ सदस्यास वाटप केलेला भूखंड खुल्या स्वरुपात किंवा बांधकामासह अन्य व्यक्तीस हस्तांतरित केला असल्यास त्या भूखंडाच्या शेवटच्या हस्तांतरणावेळी प्रचलित वार्षिक दर मुल्यांकनाच्या ६२.५ टक्क्यांप्रमाणे अनर्जित रक्कम वसूल करण्यात येईल.

अनधिकृत बहुमजली इमारत बांधून त्यातील सदनिका हस्तांतरणाबाबत शर्तभंग झाला असल्यास अशा इमारतीच्या भोगवटा प्रमाणपत्राच्या दिनांकास किंवा पहिल्या सदनिकेच्या प्रत्यक्ष विक्री दिनांकास संबंधित भूखंडाच्या बाजारमुल्याच्या ६२.५ टक्के अनर्जित रक्कम आकारण्यात येईल. सदर रक्कम सदनिकांच्या चटई क्षेत्राच्या प्रमाणात विभागून वसूल करण्यात येईल. तसेच संबंधित भूखंडावर सर्व सदनिकाधारकांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन केल्यास सदर भूखंड त्या संस्थेस हस्तांतरित करण्यात येईल. हे प्रकरण नियमबाह्य भूखंड हस्तांतरण नियमित करण्याबाबत असल्याने त्यावरील नवीन गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांना पात्रता, प्रवर्गनिहाय आरक्षण याबाबत प्रचलित शासन धोरणातील तरतुदी आणि मूळ जमीन मंजुरी आदेशातील यासंबंधीच्या अटी लागू होणार नाहीत. इमारतीसाठी वापरण्यात आलेला टीडीआर २९ सप्टेंबर २०१० च्या शासन निर्णयातील नमूद केलेल्या शुल्काच्या दीडपट रक्कम आकारुन नियमित करण्यात येईल. संबंधित इमारतीमधील सदनिकांचे यापुढील हस्तांतरण करताना जिल्हाधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घ्यावी लागणार असून प्रचलित तरतुदींनुसार हस्तांतरण शुल्क शासनाकडे भरणे अनिवार्य असेल.

भूखंडावर अनधिकृत वाणिज्य वापराबाबत शर्तभंग केलेल्या भूखंडधारकांनी संबंधित बहुमजली इमारतीचा पूर्णत: किंवा भागश: वाणिज्यिक वापर १५ टक्केच्या मर्यादेत केला असल्यास आणि अशा वापरास नियोजन प्राधिकरणाची मान्यता असल्यास १४ जून १९८८ च्या शासन निर्णयानुसार प्रचलित दराने होणाऱ्या वार्षिक परवानगी शुल्काच्या दीडपट दराने शुल्काची आकारणी करण्यात येईल. नियमितीकरणानंतर परवानगी शुल्काची नियमित आकारणी करण्यात येईल. मात्र, संबंधित भूखंडावर १५ टक्क्यांपेक्षा अधिक बांधकाम वाणिज्यिक प्रयोजनासाठी असल्यास अधिकच्या वापराच्या बांधकाम क्षेत्राशी निगडीत भूखंडाच्या क्षेत्राचे मूल्यांकन काढून त्याच्या ५० टक्के रुपांतरण शुल्क आकारुन वसूल करण्यात येईल. तसेच

वरीलप्रमाणे परवानगी शुल्काची आकारणी करण्यात येईल. तसेच या प्रक्रियेपूर्वी भूखंडावरील इमारतीच्या पूर्णत: किंवा भागश: वाणिज्यिक वापरास नियोजन प्राधिकारणाची पूर्व मान्यता मिळविणे आवश्यक असेल.

-----o-----

२३ मार्च २०१७

महसूल विभाग

## विशिष्ट प्रयोजनासाठी दिलेल्या जमिनींचा अन्य प्रयोजनासाठी पुनर्विकास करताना अधिमूल्य आकारणीसाठी नवीन धोरण

विशिष्ट प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या शासकीय जमिनींचा (नझूल जमिनी वगळून) वापर मूळ प्रयोजनाऐवजी अन्य प्रयोजनासाठी करताना विशेषत: औद्योगिक वापराच्या जमिनी निवासी किंवा वाणिज्यिक कारणांसाठी पुनर्विकसित करताना अधिमूल्य आकारणी करण्याच्या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

शासनाने विहित अटी आणि शर्तींच्या अधीन राहून कब्जे हक्काने अथवा भाडेपट्ट्याने निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक आणि अन्य प्रयोजनांसाठी वेळोवेळी विविध व्यक्ती अथवा संस्था यांना शासकीय जमिनी दिल्या आहेत. या जमिनींच्या वापरात बदल करण्यासाठी राज्य शासनाची पूर्व संमती घेण्याची तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ मध्ये कलम ३७ अ अन्वये करण्यात आली आहे. त्यापैकी औद्योगिक वापराऐवजी निवासी अथवा वाणिज्यिक वापर असा बदल करण्यासाठी अधिमूल्य आकारणीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

या धोरणातील तरतुदीनुसार विकास आराखडा, विकास नियंत्रण नियमावली किंवा अन्य वैधानिक तथा प्रशासकीय तरतुदीनुसार संबंधित जमिनीवर औद्योगिक वापर अनुज्ञेय नसावा. तसेच संबंधित जमीन कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक नसल्याची खात्री सर्व शासकीय स्तरांवरुन झाली पाहिजे. त्याचप्रमाणे जमिनीच्या बाबतीत कोणताही शर्तभंग झालेला नसावा, जमीन दिल्यापासून १० वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला असावा अशा विविध तरतुदी पडताळून पाहिल्या जातील. शर्तभंग करणाऱ्या वा निकषांनुसार पात्र नसणाऱ्या जमिनी शासनाकडे परत घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

पूर्ण बाजारमूल्य वसूल करुन कब्जे हक्काने दिलेल्या जमिनींच्या प्रयोजन बदलास परवानगी देताना सर्व बाबींची पूर्तता होत असल्यास प्रचलित वार्षिक दराच्या ५० टक्के रक्कम अधिमूल्य म्हणून वसूल करण्यात येईल. विनापरवानगी बदल केला आणि इतर शर्तींचा भंग नसेल तर ७५ टक्के रक्कम अधिमूल्य म्हणून वसूल करण्यात येईल. विनापरवानगी बदल आणि शर्तींचा भंग या दोन्ही बाबी आढळल्या तर ७५ टक्के अधिमूल्यासह दंडाची आकारणीदेखील करण्यात येईल. या धोरणात सविस्तर दिशानिर्देश व तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. ज्या औद्योगिक घटकांना शासनाकडून भूसंपादन अधिनियमान्वये जमीन संपादित करुन दिलेल्या आहेत, त्यांना हा निर्णय लागू राहणार नाही.

----o----

६ एप्रिल २०१७
गृह विभाग

## साक्षीदारांना संरक्षणासाठीच्या विधेयकाच्या मसुद्यास मान्यता

महाराष्ट्र साक्षीदार संरक्षण व सुरक्षा अधिनियम २०१७ हा नवीन अधिनियम करण्यासाठी सादर करावयाच्या प्रस्तावित विधेयकाच्या मसुद्यास राज्य मंत्रिमंडळाकडून मान्यता देण्यात आली. या विधेयकामुळे राज्यातील फौजदारी तसेच इतर गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यांमध्ये साक्षीदारांना संरक्षण पुरविणे शक्य होणार आहे.

राज्यात अनेक प्रकारच्या गुन्ह्यांच्या न्यायालयीन कामकाजात साक्षीदार तसेच त्याच्या निकटवर्तीयांना धमकी देण्यासह त्यांच्या जीवास धोका निर्माण करण्यात येत असल्याच्या तक्रारी आहेत. याबाबत उच्च न्यायालयानेही शासनास निर्देश दिले होते. त्यानुसार आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी शासनाने जानेवारी २०१५ मध्ये समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. याच कार्यवाहीचा एक भाग म्हणून महाराष्ट्र साक्षीदार संरक्षण व सुरक्षा अधिनियम २०१७ असा नवीन अधिनियम तयार करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यासाठी विधिमंडळात सादर करावयाच्या विधेयकाच्या मसुद्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

-----०-----

६ एप्रिल २०१७
पदुम विभाग

## गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र योजना राज्यात राबविण्यास मान्यता

महाराष्ट्रातील मुंबई शहर व उपनगर वगळता इतर ३४ जिल्ह्यांमध्ये भाकड गाई व गोवंश संगोपनासाठी गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र या नवीन योजनेस राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. या योजनेनुसार गोशाळा किंवा पांजरपोळ चालविण्याचा अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून जिल्ह्यांमध्ये त्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

राज्यात मार्च २०१५ पासून महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ लागू करण्यात आलेला आहे. त्यानुसार संपूर्ण गोवंशीय जनावरांच्या कत्तलीवर प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यामुळे अनुत्पादक (भाकड) गोवंशीय पशुधनाच्या संख्येत वाढ होणार असून त्याचा सांभाळ करावा लागणार आहे. त्यादृष्टीने मार्च २०१६ मध्ये जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र सुरु करण्याची घोषणा केली होती. या योजनेसाठी प्रत्येक जिल्ह्यास एक कोटी या प्रमाणे ३४ कोटींचे अनुदान उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत अनुदान द्यावयाच्या आराखड्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता तसेच गोशाळेची निवड करण्याचे अधिकार राज्यस्तरीय समितीस देण्यात आले आहेत. त्यासाठी पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येणार असून त्यामध्ये पदुम विभागाचे प्रधान सचिव किंवा सचिव आणि पुणे येथील पशुसंवर्धन आयुक्त हे सदस्य असतील. तसेच अशासकीय सदस्यांच्या निवडीचे अधिकार पदुम मंत्र्यांना राहतील.

-----०-----

६ एप्रिल २०१७
सामान्य प्रशासन विभाग

## पत्रकारांवरील हल्ले रोखण्यासाठी संरक्षण कायद्याच्या मसुद्यास मंजुरी

राज्यातील पत्रकारांवरील (प्रसारमाध्यमांतील व्यक्तींवर) होणारे हल्ले रोखण्यासाठी मांडण्यात येणाऱ्या संरक्षण विधेयकाच्या मसुद्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. हे विधेयक विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात मांडण्यासही मंजुरी देण्यात आली.

राज्यातील पत्रकारांवरील हल्ले रोखण्यासाठी आणि माध्यमांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी पत्रकारांवरील हल्ले रोखणारा संरक्षण कायदा करण्यात येत आहे. यामध्ये प्रसारमाध्यमातील व्यक्ती, प्रसार माध्यम संस्था यांच्या व्याख्येचा समावेश करण्यात आला असून हल्ला रोखण्यासाठी विविध प्रकारच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. त्यासोबतच कायद्याचा हेतूपुरस्सर गैरवापर रोखण्यासाठीही तरतूद समाविष्ट आहे.

----o----

६ एप्रिल २०१७
महसूल विभाग

## पी.एन.बी. फार्मर्स वेल्फेअर ट्रस्टला अजयपूर येथील जमीन देण्यास मंजुरी

पंजाब नॅशनल बँकेच्या पंजाब नॅशनल बँक फार्मर्स वेल्फेअर ट्रस्टला शेतकरी प्रशिक्षण सुरू करण्यासाठी मौजा अजयपूर (ता. चंद्रपूर) येथील चार हेक्टर ३४ आर. इतकी शासकीय जमीन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

शेतकरी, ग्रामीण युवक आणि महिला यांचा कौशल्य आणि सामाजिक आर्थिक विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने पंजाब नॅशनल बँकेने पंजाब नॅशनल बँक फार्मर्स वेल्फेअर ट्रस्टची स्थापना करून देशाच्या विविध भागातील ११ ठिकाणी शेतकरी प्रशिक्षण केंद्रांची स्थापना केली आहे. राज्यातील चंद्रपूर येथे अशा स्वरूपाचे केंद्र स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने जमीन उपलब्ध करून देण्याची मागणी ट्रस्टने केली होती. त्या विनंतीनुसार मौजा अजयपूर येथील शासकीय जमीन सवलतीच्या दरात ३० वर्षांसाठी देण्यास मान्यता देण्यात आली. राज्यातील विविध ठिकाणी शेतकरी प्रशिक्षण केंद्रांची स्थापना झाल्यास शेती क्षेत्रातील प्रशिक्षणाद्वारे कौशल्य वाढ होऊन ती शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी पोषक ठरणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला.

-----o-----

६ एप्रिल २०१७

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

## संतपीठ हा विषय उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्याच्या निर्णयास मान्यता

महाराष्ट्र शासनाच्या कार्यनियमावलीतील पहिल्या अनुसूचीमध्ये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडे दर्शविण्यात आलेला संतपीठ हा विषय उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यास आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील जनतेची मागणी लक्षात घेऊन पैठण येथे संतपीठ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. याबाबत शिफारस करण्यासाठी बाळासाहेब भारदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. महाराष्ट्रातील संतांच्या तत्वज्ञानाचा तौलनिक अभ्यास करुन समाजासाठी आवश्यक असणाऱ्या जीवनमुल्यांचा प्रसार करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र त्याची अंमलबजावणी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून करणे अधिक संयुक्तिक असल्याचे लक्षात आल्यानंतर हा विषय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला.

-----०-----

६ एप्रिल २०१७

अन्न, नागरी पुरवठा विभाग

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्नधान्य वाहतुकीसाठी आधारभूत दर मंजूर

लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत सुधारित धान्य वितरण पद्धतीनुसार शिधावाटप दुकानांपर्यंत नवीन वाहतूक पद्धतीने अन्नधान्य वाहून नेण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेचे आधारभूत दर आणि अटी व शर्तींना मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

राज्यातील १७ जिल्ह्यांमध्ये निविदा प्रक्रिया राबवून अन्नधान्याची वाहतूक सुरु करण्यात आली आहे. उर्वरित १७ जिल्ह्यांमध्ये तसेच मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रामध्ये निविदा प्रक्रियांना योग्य प्रतिसाद लाभलेला नाही. या कारणांमुळे अन्नधान्याच्या उचलीवर परिणाम होत असल्यामुळे नवीन वाहतूक कंत्राटांसाठी आधारभूत दर, निकष, अटी व शर्ती यामध्ये सुधारणा करुन निविदा प्रक्रिया अधिक सुटसुटीत व पारदर्शक करण्यात आली आहे.

मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रामध्ये परिमंडळनिहाय तसेच पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद व सोलापूर या महानगरपालिका क्षेत्रासाठी थेट वाहतुकीची कार्यपद्धती कार्यान्वित करुन स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविणे, भारतीय अन्न महामंडळाचा बेसडेपो व शासकीय धान्य गोदाम एकाच शहरात असणाऱ्या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी बेसडेपो ते शिधावाटप दुकानांपर्यंत थेट वाहतुकीची कार्यपद्धती कार्यान्वित करणे, जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी थेट वाहतुकीसह पहिल्या व दुसऱ्या टप्प्याच्या वाहतुकीसाठी एकत्रित निविदा प्रक्रिया राबविणे, परिगणनेची कार्यपद्धती जास्तीत जास्त सुटसुटीत व पारदर्शक होण्यासाठी वाहतुकीच्या प्रत्येक प्रकारासाठी स्वतंत्र प्रति क्विंटल आधारभूत दर निश्चित करुन त्याअनुषंगाने अटी व शर्तींमध्ये

सुधारणा करणे, निविदा मंजुरीसाठी जिल्हास्तर, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र आणि राज्यस्तरावर स्थापन करावयाच्या समितींचे स्वरुप या सर्व बाबींना मान्यता देण्यात आली आहे.

-----o-----

६ एप्रिल २०१७

महिला व बाल विकास विभाग

<u>बाल विकास प्रकल्प अधिकारी</u>

**अनुसूचित क्षेत्रातील गट-ब संवर्गातील**

**रिक्त पदे प्राधान्याने भरणार**

महिला व बालविकास विभागांतर्गत अनुसूचित क्षेत्रातील गट-ब संवर्गात रिक्त असलेली बाल विकास प्रकल्प अधिकारी (गट-ब) तसेच महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत शासकीय संस्थांमधील गट-ब ची रिक्त पदे प्राधान्याने भरण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील सर्वच विभागातील अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे प्राथम्याने भरण्यासाठी महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम २०१५ मधील ६ (अ) नंतर ६ (अ)(अ) या नवीन परंतुकाचा समावेश करण्यात येणार आहे. या परंतुकानुसार अनुसूचित क्षेत्रातील (केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या) पदे प्राथम्याने भरण्याची प्रशासकीय विभागास आवश्यकता असल्यास नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, कोकण, पुणे या क्रमानुसार चक्राकार पद्धतीने महसुली विभागातील अनुसूचति क्षेत्रात गुणवत्ता यादीतील क्रमांकानुसार उमेदवारांचे वाटप करण्यात येईल. या सहाही महसुली विभागातील अनुसूचित क्षेत्रातील सरळसेवा कोट्याची रिक्त पदे भरल्यानंतर गुणवत्ता यादीतील उर्वरित उमेदवारांना ६ (अ) प्रमाणे महसुली विभाग वाटप करण्यात येईल.

राज्यातील आदिवासी क्षेत्रातील बालकांच्या कुपोषणाची समस्या लक्षात घेता महिला व बाल विकास विभागांतर्गत आदिवासी बहुल महसुली विभागातील बाल विकास प्रकल्प अधिकारी (गट-ब) संवर्गात अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे प्राधान्याने भरण्यात येतील. तसेच त्यानंतर आदिवासी प्रकल्पाव्यतिरिक्त अन्य प्रकल्पातील बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची (गट-ब) पदे आणि महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत शासकीय संस्थांमधील गट-ब संवर्गातील रिक्त पदे चक्राकार पद्धतीने गुणवत्ता यादीतील क्रमानुसार भरण्यात येणार आहेत.

----o----

६ एप्रिल २०१७

संसदीय कार्य विभाग

<u>अर्थसंकल्पीय अधिवेशन ७ एप्रिलला संस्थगित</u>

**विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन २४ जुलै २०१७ रोजी मुंबईत होणार**

विधानमंडळाचे सध्या सुरू असलेले अर्थसंकल्पीय अधिवेशन शुक्रवार दि. ७ एप्रिल २०१७ रोजी संस्थगित करण्यासह आगामी पावसाळी अधिवेशन सोमवार दि. २४ जुलै २०१७ रोजी मुंबई येथे अभिनिमंत्रित करण्यासाठी राज्यपालांना शिफारस करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

----o----